2019-2020
C-III (I)
*

ISSN: 2454-5503

08

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

Vol. 5 No. 5 Sept.-Oct. 2019

Impact Factor: 4.197 (IIJIF)

*Chief Editor*
**Dr Kalyan Gangarde**
Director, Centre for Humanities and Cultural Studies

*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade**
Asst. Prof., Birla College, Kalyan (W)

*Co- editors*
Dr. Sadhana Agrawal (Gwalior)
Pandurang Barkale (Mumbai)
Dashrath Kamble (Kalyan)
Bharat Gugane (Nashik)

MGEW SOCIETY'S
CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES
KALYAN (MAHARASHTRA)
Contact: +91 9730721393 +91 8329000732 chcskalyan@gmail.com

**Full Journal Title:** Chronicle of Humanities & Cultural Studies(CHCS)
**Print ISSN:** 2454-5503
**Impact Factor:** 4.197 (IIJIF)
**Frequency:** Bimonthly / **Language:** Multi language / **Journal Country/Territory:** India
**Publisher:** Centre for Humanities & cultural Studies, A-102, Sanghavi Regency, Sahyadrinagar, Kalyan (W) (MS).
**Subject Categories:** Humanities & Cultural Studies

*Chief Editor*
**Dr Kalyan Gangarde**
Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)
*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade,** Asst. Prof., Birla College, Kalyan (W)
*Co- editors*
**Dr. Sadhana Agrawal,** Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India
**Pandurang Barkale,** Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
**Bharat Gugane,** Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
**Dashrath Kamble,** Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
**Sachin Bhumbe,** Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

EDITORIAL ADVISORY BOARD

**Aju Mukhopadhyay,**
a poet, author and critic, 8 Cheir Lodi Street, Pondicherry, India.
Email: ajum24@gmail.com
**Dr R.T. Bedre,**
Principal RSPMS' SPP College, Sirsala, Dist. Beed (MS)
**Dr (Mrs.) Smita R. Nagori,**
Head,PG Department of English, M.U.College Udgir, Dist. Latur, Maharashtra, India. Email: smita.lakhotiya@gmail.com
**Dr Arvind Nawale**
Head, Department of English, Shivaji Mahavidyalaya Udgir, Dist. Latur (Member, BoS in English, Former Member of the Senate, Faculty of Arts, SRTM University, Nanded arnnawale@gmail.com
**Dr Kailash Nimbalkar,**
Principal, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra, India. Email: nimbalkar_8@rediffmail.com.
**Tsai-ching Yeh**
Assistant professor, Department of English, National Taipei University of Technology. (Taivan)
**Dr B. N. Gaikwad,**
Vice Principal, N.G. Acharya and D.K. Marathe College of Arts, Commerce and Science , Chembur (East), Mumbai-400071
**Dr Simon Philip,**
Assistant professor, Department of Social Work, Voorhees College, Vellore
**Dr Binu Anitha Josheph**
Assistant professor, Department of English, Voorhees College, Vellore
**Dr Chandrashekhar Kanase**
Head, Department of Dramatics, SPP College, Sirsala, Dist Beed (MS)

EDITORIAL BOARD

**Dr Rajivkumar Dumka,** Zarkhand.
**Dr.Mahendra Shinde,** Associate Professor and Head, Department of English, N.M. Sailu, Dist. Parbhani, Maharashtra, India.
**Ram Bhise,** Assistant Professor, Saraswati College of Engineering, Kharghar, Navi Mumbai Maharashtra,India.
**Dr Asish Gupta,** Asst. Professor, J. H. Govt. P. G. College, Betul MP.

| Subscription Rates | | |
|---|---|---|
| | Annual membership (Individual) | Rs. 1,800 (150 $ for foreigners) ( Six Issues ) |
| | Bi-annual Membership | Rs. 3,500 (250 $ for foreigners) |
| | Institutional annual membership | Rs. 2,200 |
| | Institutional Bi-annual membership | Rs. 4,200 |

*Those interested in making online transactions, the following details may be of use:*

| Bank Name | Account Name | Account Number | IFSC code |
|---|---|---|---|
| Canara Bank **(Branch: New Marine Lines, Mumbai)** | Centre for Humanities & Cultural Studies | 1389101071921 | CNRB0001389 |

*DISCLAIMER: Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references and biographies/references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.*

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

## CONTENTS

From the Editor's Desk......... | 4

1. Adventure' As Trope: Indian Children's Literature in English / **Riyaz Ahmad Kumar | 5**

2. Ushering the Marginalized Into the Mainstream through Task Based Language Teaching / **Chumki Biswas | 7**

3. What Is Morphology In English Language Teaching (ELT) ?/ **Prakash S. Chauhan | 11**

4. Feminist Concepts In The West: Theories. History & Dynamics / **Geeta Sahu | 14**

5. Asymmetrical Federalism And Accommodation In India / **M.Shafi Bhat | 18**

6. Social Realism in Manju Kapur's Novel 'Custody' / **Kadam K.R. & Dr. Gangane A.S. | 28**

7. Effective Municipal Governance and Personnel Management **Sanghmitra S. Sadaphule & Dr. Shridhar M. Kolhe | 30**

8. विश्वमंच पर हिंदी | डॉ. अपर्णा पाटील | 33

9. भारतातील धर्मानिहाय लोकसंख्या बदलाचा अभ्यास | प्रा.डॉ. दयानंद उजळंबे | 35

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

9.

# भारतातील धर्मनिहाय लोकसंख्या बदलाचा अभ्यास

**प्रा.डॉ. दयानंद उजळंबे**
उपप्राचार्य, तथा भूगोल विभाग प्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड. जि.परभणी.

**सारांश :** भारत विविधतेने नटलेला देश आहे. ही विविधता भौगोलिक , सांस्कृतिक, धार्मिक आणि इतर क्षेत्रातही आढळते. भारतासारख्या खंडप्राय राष्ट्रात विविध धर्मांचे लोक वास्तव्यास असुनही सर्व धर्माचा आदर करणे ही भारतातील लोकांची परंपरा राहिलेली आहे. ती संस्कृतीही आहे. प्रस्तूत शोधनिबंधामध्ये भारतात १९५१ ते २०११ दरम्यान धर्मनिहाय लोकसंख्या किती आहे? त्यात बदल झालेला आहे का? कोणत्या धर्मात लोकसंख्या कमी झालेली आहे? त्याबरोबरच धर्मनिहाय लोकसंख्या वाढीचे आणि घटीचे कारणे कोणती आहेत त्यावर प्रतिबंधात्मक वाढीचा दर कमी केल्यास भारतातील साधनसंपत्तीवर त्याचा ताण कमी होईल, व्यक्तीच्या राहणीमानात बदल होऊन देशाचा आर्थिक स्तर सुधारेल. हा प्रस्तूत शोधनिबंधाचा मुख्य उद्देश आहे.
**बीजसंज्ञा:** धर्मनिहाय लोकसंख्या, लोकसंख्या वाढ, आर्थिक विकास, लोकसंख्या वाढीचा साधनसंपत्तीवर पडणारा ताण, भविष्यातील लोकसंख्या.

**अ) प्रस्तावना :**

प्रस्तूत शोधनिबंधामध्ये १९५१ ते २०११ दरम्यान भारतातील धर्मनिहाय लाकसंख्येमध्ये झालेल्या बदलाचा अभ्यास असून लोकसंख्या बदलामुळे लोकसंख्येत झालेली वाढ किती होत आहे, लोकसंख्येच्या आकारात आणि रचनेमध्ये झालेल्या बदलामुळे साधनसंपत्तीवर, शासनाच्या वेगवेगळ्या सुविधांवर, आर्थिक वृद्धी दारावर मोठ्या प्रमाणात ताण येत असून विशिष्ठ धर्मातच वाढणारी लोकसंख्या आणि कमी होणाऱ्या लोकसंख्येमुळे आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण होत असून, धर्मनिहाय लोकसंख्येमध्ये जो बदल झालेला आहे तो दशकनिहाय कशा पद्धतीने झालेला आहे. धर्मनिहाय लोकसंख्येच्या बदलामुळे होणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक आणि लोकसंख्या वाढीच्या दरामध्ये कसा बदल होईल या संदर्भातील अभ्यास प्रस्तूत शोधनिबंधाचा आहे.

**ब) उद्दीष्ट्ये :**

१) भारतातील धर्मनिहाय लोकसंख्येचा अभ्यास करणे.
२) धर्मनिहाय लोकसंख्येत झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.
३) धर्मनिहाय लोकसंख्येच्या बदलामुळे सामाजिक, आर्थिक बदल कशा पद्धतीने होत आहेत याचा अभ्यास करणे.

**क) क्षेत्रनिवड आणि अभ्यास पद्धती :**

प्रस्तूत शोधनिबंधामध्ये भारतातील एकूण दशकनिहाय, धर्मनिहाय लोकसंख्येचा अभ्यास केला आहे. प्रस्तूत शोधनिबंधासाठी वापरलेली आकडेवारी ही दुय्यम स्वरुपाची असून सोशिओ-इकॉनॉमी ॲन्ड कास्ट सेन्सस २०११ ने प्रकाशित केलेली आकडेवारीचा उपयोगात आणलेली आहे. प्रस्तूत आकडेवारीचे सांख्यकीय आणि आलेखीय पृथःकरण केले असून आकडेवारी टक्केवारीमध्ये घेतलेली आहे. दशकनिहाय आकडेवारीचे विश्लेषण करुन दशकनिहाय धार्मिक लोकसंख्येमध्ये जो बदल झालेला आहे त्याचे पृथःकरण करुन निष्कर्ष आणि उपाययोजना सांगितलेल्या आहेत.

**ड) विषय विवेचन :**

भारतातील धर्मनिहाय लोकसंख्येचा अभ्यास करताना भारत सरकारने प्रकाशित केलेल्या धर्मनिहाय लोकसंख्येचा अभ्यास या शोधनिबंधामध्ये करण्यात आलेला असून, सारणी क्र.०१ नुसार भारतातील १९५१ ते २०११ च्या धर्मनिहाय लोकसंख्येचा अभ्यास केला असता हिंदू धर्माची १९५१ मध्ये भारतातील एकूण लोकसंख्येच्या

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

८४.१% होती पुढे १९६१ मध्ये ८३.४५%, १९७१ मध्ये ८३.७३%, १९८१ मध्ये ८२.३०%, १९९१ मध्ये ८१.५३%, २००१ मध्ये ८०.४६%, तर २०११ मध्ये ७८.३५% लोकसंख्येची नोंद झाली असून मागील सहा दशकामध्ये हिंदू लोकसंख्येमध्ये घट झाल्याचे प्रस्तूत आकडेवारीवरुन निदर्शनास येते तर त्या उलट मुस्लीम धर्मांची १९५१ मध्ये ९.८०% लोकसंख्या होती पण दशकनिहाय लोकसंख्येचा आढावा घेतला असता १९६१ मध्ये १०.६९%, १९७१ मध्ये ११.२१%, १९८१ मध्ये ११.७५%, १९९१ मध्ये १२.६१%, २००१ मध्ये १३.४३% तर २०११ मध्ये १४.२% लोकसंख्येची नोंद झाली असून १९५१-२०११ दरम्यान मुस्लीम धर्माच्या लोकसंख्येत ४.४% ची मोठी वाढ झाली असून हिंदू धर्मांची लोकसंख्या मात्र १९५१ ते २०११ दरम्यान (-५.७५% ) नी घटली आहे. हिंदू धमांत शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार, शासनाच्या नियमाचे पालन, स्त्रियांना समान दर्जा देण्याचा प्रयत्न, कुटुंबाचे उत्पन्न आणि राहणीमानात वाढ करण्यासाठी केलेल्या प्रयत्नामुळे लोकसंख्या घटली असून मुस्लीम धर्मात मात्र धर्माचा प्रभाव आणखीन कमी झाल्याचा दिसत नाही हे प्राप्त आकडेवारीवरुन स्पष्ट होते. भारतातील लोकसंख्या वाढीमध्ये मुस्लीम धर्माची वाढलेली लोकसंख्या तिव्र चिंताजनक असून भविष्यातील लोकसंख्या वाढीवर याचा विपरीत परिणाम होणार असून सामाजिक, राजकिय चित्रच बदलण्याची शक्यता यातून दिसून येते.

**सारणी क्र.१**


**भारतातील धर्मनिहाय लोकसंख्या % मध्ये**

| अ. क्र. | धर्म | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ | १९५१ ते २०११ मधील बदल% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | हिंदू | ८४.१ | ८३.४५ | ८२.७३ | ८२.३० | ८१.५३ | ८०.४६ | ७८.३५ | -५.७५ |
| ०२ | मुस्लीम | ९.८० | १०.६९ | ११.२१ | ११.७५ | १२.६१ | १३.४३ | १४.२ | +४.४ |
| ०३ | ख्रिश्चन | २.० | २.४४ | २.६० | २.४४ | २.३२ | २.३४ | २.३४ | +०.३४ |
| ०४ | शिख | १.८९ | १.७९ | १.८९ | १.९२ | १.९४ | १.८७ | १.८७ | +०.०२ |
| ०५ | बुद्धीस्ट | ०.७४ | ०.७४ | ०.७० | ०.७० | ०.७७ | ०.७७ | ०.७७ | +०.०३ |
| ०६ | जैन | ०.४६ | ०.४६ | ०.४८ | ०.४७ | ०.४० | ०.४१ | ०.४१ | -०.०५ |
| ०७ | पारशी | ०.१३ | ०.०९ | ०.०९ | ०.०९ | ०.०८ | ०.०६ | ०.०६ | -०.०७ |
| ०८ | इतर | ०.४३ | ०.४३ | ०.४१ | ०.४२ | ०.४४ | ०.७२ | ०.७२ | -०.०२ |

संदर्भ : सोशिओ-इकॉनॉमीक ॲन्ड कास्ट सेन्सस, २०११

Graph No.1

Religious Wise Population in India (Population in %)



ख्रिश्चन धर्माची १९५१ मध्ये २% लोकसंख्या होती मात्र २०११ मध्ये २.३४% लोकसंख्या झाली असून केवळ ०.३४% लोकसंख्या वाढलेली अहे ती मुस्लीम धर्माच्या तुलनेत कितीतरी पटीने कमी आहे. शिख धर्माच्या लोकसंख्येचे विश्लेषण केले असता १९५१ मध्ये १.८९% लोकसंख्या होती. पुढील काळात कमी-अधिक होऊन २०११ मध्ये १.८७% लोकसंख्या झाली असून, ०.०२% नी लोकसंख्या शिख धर्माची घटली आहे. बुद्धीस्ट समाजाची १९५१ मध्ये ०.७४% लोकसंख्या होती तर २०११ मध्ये ०.७७% लोकसंख्या झाली असून ०.०३% नी लोकसंख्या वाढलेली असून शिक्षणाच्या जागरुकतेमुळे, सामाजिक हक्काच्या जाणीवेमुळे सरकारच्या आरक्षण धोरणामुळे बुद्धीस्ट समाज साक्षर झाल्यामुळे लोकसंख्या वाढीचा दर अधिक दिसत नाही ही जमेची बाजू आहे. तर जैन धर्मामध्ये १९५१ मध्ये ०.४६% लोकसंख्या होती. पुढे दशकनिहाय जैन धर्माची लोकसंख्या घटतच जाऊन २०११ मध्ये ०.४१% लोकसंख्या झालेली असून ०.५% नी जैन धर्माची लोकसंख्या घटली आहे. जैन धर्मातील मुलींचे प्रमाण कमी होणे, साक्षरता, उद्योग, व्यापार, शहरी भागातील वास्तव्य यामुळेही जैनधर्मियांची लोकसंख्या घटत चालली आहे. तर पारशी समाजाची भारतात १९५१ मध्येच लोकसंख्येचे प्रमाण ०.१३% होते. पुढे दशकनिहाय लोकसंख्येत घट होऊन १९११ मध्ये केवळ ०.०६% इतकीच लोकसंख्या या धर्माची असून भविष्यातील ४ ते ५ दशकात या धर्माची लोकसंख्या ०.०१ ते ०.०२% पर्यंतही येवू शकते. इतर धर्माच्या लोकसंख्येमध्ये १९५१ मध्ये ०.४३% लोकसंख्या भारतात वास्तव्यात होती पुढे २००१ आणि २०११ मध्ये इतर धर्माच्या लोकसंख्येत वाढ झाली असून ती ०.७२% इतकी झाली. एकंदरीत हिंदू, शिख, जैन, पारशी या धर्मातील १९५१ ते २०११ दरम्यान लोकसंख्या घटली असून मुस्लीम, ख्रिश्चन, बुद्धीस्ट आणि इतर धर्माची लोकसंख्या वाढलेली दिसून येते. पण लोकसंख्या वाढीचा तिव्र वेग मात्र मुस्लीम धर्मामध्ये दिसून येतो. इतर धर्माच्या लोकसंख्या वाढीचा वेग १% पेक्षा कमी आहे.

**इ) निष्कर्ष :**

१) १९५१-२०११ या दरम्यानच्या धर्मनिहाय लोकसंख्येचा अभ्यास केला असता मुस्लीम, ख्रिश्चन, बुद्धीस्ट आणि इतर धर्माच्या लोकसंख्येत वाढ झालेली आहे.

२) १९५१-२०११ दरम्यानच्या धर्मनिहाय लोकसंख्येचा अभ्यास केला असता हिंदू, शिख, जैन, पारशी धर्मातील लोकसंख्या घटली आहे.

३) हिंदू धर्मामध्ये -५.७५% लोकसंख्या (१९५१-२०११) दरम्यान घटली असून याच कालावधीत मुस्लीम धर्माची लोकसंख्या मात्र +४.४% वाढली असून भारतासारख्या अधिक लोकसंख्या असणाऱ्या देशात ही वाढ गंभीर आहे.

४) बुद्धीस्ट धर्मात साक्षरतेचा दर वाढल्यामुळे लोकसंख्या वाढीचे प्रमाण मागील सहा दशकात केवळ ०.०३% वाढले आहे.

५) जैन धर्मामध्ये साक्षरता, मुलींचे प्रमाण कमी असल्यामुळे तसेच उद्योग, व्यापार राहणीमानाचा दर्जा उत्तम असल्यामुळे कुटुंबाची लोकसंख्या नियंत्रणासंदर्भात जागरुक असल्यामुळे लोकसंख्या -०.०५% नी घटली आहे.

**ई) उपाय-योजना :**

भारतात लोकसंख्या वाढीचा दर इतर विकसीत राष्ट्राच्या तुलनेत खुपच जास्त आहे. विशेषतः मुस्लीम धर्मामध्ये मागील सहा दशकात लोकसंख्या +४.४% वाढली असून या धर्मात लोकसंख्या नियंत्रणासंदर्भात ठोस नियमाची अंमलबजावणी आवश्यक असून भविष्यात अशाच पद्धतीने लोकसंख्या वाढत राहिली तर साधनसंपत्तीवर ताण येऊन आर्थिक स्तर देशाचा आणखीन घसरु शकतो. तसेच जैन धर्मामध्ये मुलीचे प्रमाण दिवसेंदिवस घटत असल्यामुळे लोकसंख्या नियंत्रणात असली तरी लिंगगुणोत्तर समतोल राखण्यासाठी जाणीव जागृतीची गरज आहे. तर पारशी धर्माची लोकसंख्या भविष्यातील ४ ते ५ दशकात आणखीन खुप कमी होऊ शकते त्यामुळे या

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

धर्मातील लोकांना शासनाच्या विशेष सुविधा मिळणे आवश्यक आहे.

विशेषतः मुस्लीम समाजाला शिक्षणाचा सुविधा, शक्य तेथे आरक्षण, स्त्रियांचा सन्मान, लोकसंख्या नियंत्रणावर तिव्र नियंत्रणाची गरज आहे.

संदर्भ :

१. www.https://en.m.wikipedia.org
२. www.https://censusindia.gov.in
३. www.https://m.economictimes.com
४. www.https://business-standard.com

❑❑❑